१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत वादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब माफ होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादीच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील वादी क्र.२ वसंत अनंत पेडणेकर हे दिनांक ०५/१०/२०२३ रोजी मयत झाले. त्यांचे वारस मुदतीत दाखल करणे आवश्यक होते, परंतु वादी क्र.२ यांचा मृत्यू दाखला वेळीच उपलब्ध न झालेने त्यांचे वारस दाखल करणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे वादीने मयत वादी क्र.२ वसंत अनंत पेडणेकर यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी अर्जात विलंबाबाबत नमूद करीत असलेले कारण संयुक्तीक नाही. प्रस्तुत अर्जावर वादी क्र.२ यांचे वारसांच्या सह्या दिसून येत नाहीत. वादीचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नसल्याने नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. तसेच वादी यांनी न्यायालयाचा बहुमूल्य असा वेळ वाया घालविलेला आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावयाचा झालेस रक्कम रु.१०,०००/– इतका खर्च आकारणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने सरसनिरस धडेवाटप व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत वादी क्र.२ वसंत अनंत पेडणेकर यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे.

त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे वादींचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. मयत वादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रूपये २००/– इतका खर्च आकारुन माफ करणेत येतो.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.10.01 17:02:20 +0530

दिनांक– २६/०९/२०२४ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण– सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

सावंतवाडी.